दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२० नोव्हेंबर २०२५ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ९० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 20 Nov 2025 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 90 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### मंत्री उपस्थित नसतील तर निर्णयप्रक्रियेत अडथळे

**मुंबई–** शेवटी, मंत्रिमंडळ बैठकीला काही मंत्र्यांची अनुपस्थिती हे देखील राज्याच्या प्रशासनासाठी योग्य संकेत नसल्याचे म्हणत सुळेंनी सरकारवर टीका केली. महत्त्वाच्या बैठकीत मंत्री उपस्थित नसतील तर निर्णयप्रक्रियेत अडथळे येतात, आणि त्याचा फटका थेट जनतेला बसतो, असे त्यांनी सांगितले. कालांतराने विविध पक्षप्रवेश, ड्रग्ज प्रकरणे, आरोप-प्रत्यारोप यामुळे राज्यातील राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत. सुळे यांच्या पत्रकार परिषदेने या पार्श्वभूमीवर सरकारविरोधी टीकेला एक नवीन दिशा दिल्याचे दिसत आहे. पुढील काही दिवसांत या प्रकरणाला कोणते वळण मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिवसेनेच्या मंत्र्यांच्या नाराजीचा दावा भाजपने फेटाळला

# कुणीही नाराज नाही, निवडणुकांमुळे गैरहजर राहिले; चंद्रशेखर बावनकुळेंचे स्पष्टीकरण

**मुंबई (वृत्तसंस्था)–**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या (शिंदे गट) मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकल्याची माहिती समोर आल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली होती. भाजप मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या मंत्र्यांनी ही भूमिका घेतल्याचे बोलले जात होते. मात्र, यावर भाजपने तातडीने स्पष्टीकरण देत, कोणताही मंत्री नाराज नसल्याचा दावा केला आहे.शिवसेनेचे सर्व मंत्री आजच्या प्री-कॅबिनेट बैठकीला उपस्थित होते. मात्र, त्यानंतर झालेल्या मुख्य मंत्रिमंडळ बैठकीला एकनाथ शिंदे वगळता शिवसेनेचा एकही मंत्री पोहोचला नाही. कॅबिनेट बैठक संपल्यानंतर शिवसेनेच्या मंत्र्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात धाव घेतली. या भेटीत मंत्र्यांनी भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्यात येत असल्याच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. फडणवीस आणि शिवसेनेच्या मंत्र्यांत रात्री उशिरापर्यंत बैठक सुरू होती. दरम्यान, चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकताच माध्यमांशी संवाद साधत, कोणत्याही मंत्र्यांनी नाराजी नसल्याचे म्हटले आहे.



महसूल मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी संवाद साधत 'नाराजी'चे वृत्त फेटाळून लावले. कुणीही मंत्री नाराज नाहीत. एकनाथ शिंदे स्वतः बैठकीला हजर होते. असे त्यांनी स्पष्ट केले.चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनुपस्थितीचे कारण स्थानिक निवडणुका असल्याचे सांगितले. आज बऱ्यापैकी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अर्जांची छाननी सुरू आहे. भाजपचे देखील आठ मंत्री आपापल्या जिल्ह्यात प्रभारी म्हणून उपस्थित असल्याने गैरहजर होते. शिवसेनेचे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्रीसुद्धा आपापल्या भागात आहेत. त्यामुळे आजच्या बैठकीतील मंत्र्यांची संख्या कमी होती. दुसऱ्या कोणत्या कारणासाठी कुणी अनुपस्थित नव्हते, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी बावनकुळे यांनी पक्षप्रवेशावरून महायुतीमध्ये काहीशी नाराजी तयार झाल्याचे मान्य केले. महायुतीतील पक्षातील कुठलाही नेता एकमेकांच्या पक्षात जाणार नाही, असे आधीपासून ठरलेले आहे. पण मधल्या काळात काही अपरिहार्य घटना घडल्या. त्यावेळी भाजपमधील काही नेते एकनाथ शिंदेंकडे गेले. शिंदेंकडील काही अजित पवारांकडे गेले. अजित पवारांकडील आमच्याकडे आले. असे काहीसे पक्षप्रवेश झाले आहेत. त्यामुळे यासंदर्भात थोडीशी नाराजी तयार झाली असेल, पण आजच्या बैठकीत मंत्र्यांच्या अनुपस्थित राहण्यामागचे हे कारण नव्हते, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.या सर्व प्रकारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे तिघेही नेते एकत्र बसून निर्णय घेतील, असेही बावनकुळे यांनी नमूद केले. सरकारमध्ये सर्व आलबेल असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात आला आहे.

## मल्टी कमोडिटी एक्सचेंज (एम.सी.एक्स.) मार्फत

# शासकीय आय.टी.आय.कॉलेज वडवणी येथे कार्यक्रम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

शासकीय आय.टी.आय. कॉलेज वडवणी येथे भारतसरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून आय.टी.आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री एस. ओ.बनगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना डिमॅट अकाउंट,फायनान्शियल मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरावर




सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असेल असलेला फरक, तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व याचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी प्रा.एम.एच.मोमीन सर,एस.एल.राठोड सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन केले व सौ.एस.डी ठोंबरे मॅडम यांनी सूत्रसंचालन केले.तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत बिरसा मुंडा जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेत मुंडा जमातीचे लोकनायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त दि.१५ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंड मधील उलीहातु येथे दि. १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झाला.बिरसा मुंडा हे १९ व्या शतकातील एक आदिवासी स्वातंत्र्यसैनिक व मुंडा जमातीचे लोकनायक होते.ज्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध आणि जमिनदार जमात वाद्या विरुध्द संघर्ष केला. त्यांनी 'उलुगान' (मोठी चळवळ)चे नेतृत्व केले. त्यांनी आदिवासींच्या हक्कासाठी लढा दिला. त्यांना धरती आबा म्हणून ओळखले जाते.बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस राष्ट्रीय आदिवासी गौरव दिवस साजरा



केला जातो.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळेचे प्राथमिक पदवीधरशिक्षक श्री डॉ.रामकिशन मुळे सर,श्री लोंढे आकाश दत्तु सर ,श्री संदीप ठोंबरे सर, श्री राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आबासाहेब तुळशिराम धपाटे सर, श्रीमती निलावती आनंदराव भोरे मॅडम, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,ट्रेनी शिक्षिका रोहिणी काळे मॅडम यांनी सविस्तर माहिती दिली.बिरसा मुंडा यांना भगवान मानलेजाते. त्यांच्या जयंतीनिमित्त शाळेत विद्यार्थ्यांचे विविध उपक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री राहुल बजरंग बचुटे सर यांनी केले व श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम यांनी आभार मानले.

# मल्टी कमोडिटी एक्सचेंज एम.सी. एक्स मार्फत शासकीय आय.टी.आय. कॉलेज कळंब येथे कार्यक्रम संपन्न



दैनिक वादळ वार्ता

**कळंब । प्रतिनिधी**

शासकीय आय.टी.आय. कॉलेज कळंब येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच एम. सी.एक्सच्या माध्यमातून आय.टी.आयच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य श्री के. जे.पवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एम.सी.एक्स चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थितविद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना डिमॅट अकाउंट,फायनान्शियल मार्केट्स,कमोडिटीचे प्रकार,जागतिक स्तरावर सक्रिय असलेल्या कमोडिटीज,वेअर हाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्युलेशन क्ट, कमोडिटी व इक्विटी मध्ये असलेला फरक,तसेच सेबीच्या सारथी प चे महत्व इत्यादीचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्या साठी प्रा.एस.जी. दंडनाईक,बी.एम.उदबुके सर यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन केले.तसेच या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहराच्या विकासासाठी सौ.शिफा बिलाल चाऊस यांची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी-मोहन जगताप

## टक्केवारी खाणाऱ्या आमदाराला हद्दपार करणार-बाबुराव पोटभरे

### शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाच्या उमेदवाऱ्या पत्रकार परिषदेत केल्या जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

शहराच्या विकासासाठी समृद्धीसाठी आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी सौ.शिफा बिलाल चाऊस यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आली आहे. चाऊस यांच्या माध्यमातून आम्ही शहराचा विकास करणार असल्याचे मोहन जगताप म्हणाले. तर विकास कामात टक्केवारी खाऊन भ्रष्टाचार करणाऱ्या आ. प्रकाश सोळंके यांना नगर परिषदेच्या निवडणुकीतून हद्दपार करणार असल्याचे बाबुराव पोटभरे यांनी सांगितले. मोहन जगताप यांच्या पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष नगरसेवक पदाचे उमेदवार बुधवार दि.१९ रोजी जाहीर करण्यात आले. यावेळी ते पत्रकारांना बोलताना म्हणालल की, शहरात नागरी समस्या प्रलंबित आहेत. भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. अशा स्थितीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट निवडणुकीच्या मैदानात उतरला असून



शहराच्या विकासाला आम्ही प्राधान्य देणार आहोत. असे सुतोवाचन पत्रकार परिषदेत पक्षाचे नेते मोहन जगताप यांनी केले. दरम्यान नाट्यगृह,आठवडी बाजार, पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. तर बहुजन विकास मोर्चा मोहन जगताप, सहाल चाऊस यांना सोबत घेऊन आ. प्रकाश सोळंके यांना नगरपरिषद निवडणुकीत हद्दपार करणार आहे. ही लढत टक्केवारी खाऊन गलेलठ्ठ होणाऱ्या आमदार सोळंकेला धडा शिकवणारी असेल असे बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेला माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायण डक, कचरू खळगे, विश्वंभर थावरे, सहाल चाऊस, श्रीकृष्ण सोळंके, शकील कुरेशी, इत्यादी उपस्थित होते. यावेळी प्रभाग क्रमांक १ मध्ये दळवी जया, शरद यादव प्रभाग क्रमांक २ जावळे उज्वला, तालेब चाऊस, प्रभाग क्रमांक ३ सय्यद आली नूर, शेख नाजमीन,प्रभाग क्रमांक ४ मेंडके किशोर, मेंडके कांताबाई, प्रभाग क्रमांक ५ सुचिता होके, चंद्रकांत देशमुख, प्रभाग क्रमांक ६ गंगाबाई भोसले, लतीफ सय्यद नूर, प्रभाग क्रमांक ७ शिंदे संध्या, शंकर शेंडगे, प्रभाग क्रमांक ८ सहाल चाऊस, शेख नूरजहाँ. प्रभाग क्रमांक ९ महेमुद कुरेशी, सीमा होके, प्रभाग क्रमांक १० नीला इतापे, इम्रान खान, प्रभाग क्रमांक ११ सुलताना कुरेशी, अजिंक्य डक, प्रभाग क्रमांक १२ लता वाघमारे, सय्यद तौफिक, प्रभाग क्रमांक १३ ऊषा अशोक लांडगे, सय्यद अफसाना सलीम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# हिवाळ्यात गूळ अन् चणे खाल्ल्यास काय होते?


**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

हिवाळा ऋतू सुरु झाला की शरीराला अधिक ऊर्जा आणि ऊबदारतेची गरज असते. या ऋतूत सगळ्यात जास्त गरज असते ती योग्य आहाराची. हिवाळ्यात शरीराला ताकद देणारं एक खाद्य मानलं जातं ते म्हणजे गूळ अन् चणे. घरातील मोठ्यांकडून अनेकदा हे ऐकलं असेल की गूळ अन् चणे खाणे किती शक्तीवर्धक असते. ते चवीला तर चांगले असतेच पण त्यामुळे शरीराला ऊर्जाही मिळते.तुम्ही देखील नैसर्गिक पद्धतीने आरोग्य निरोगी ठेवण्याचा विचार करत असाल तर डाएटमध्ये गूळ आणि चण्याचा समावेश करणं फायदेशीर ठरते. गूळ - चणे एकत्रित खाल्ल्यास आरोग्यास दुप्पट फायदे मिळतात. गूळ आणि चणे खाण्याचे फायदे अनेक फायदे आहेत. ते कोणते फायदे आहेत ते जाणून घेऊयात.

**शरीराला ताकद मिळते**

तज्ज्ञांच्या मते गूळ आणि चणे खाल्ल्यास शरीराला लगेचच ऊर्जा मिळते. विशेष म्हणजे शरीरातील ऊर्जा जास्त काळ टिकून राहते. हिवाळ्यामध्ये थकवा आणि आळस अधिक जाणवतो. म्हणून डाएटमध्ये गूळ-चण्याचा समावेश करणे महत्त्वाचे आहे.





**पचनप्रक्रिया सुधारते**

आयुर्वेदिक डॉक्टरांच्या माहितीनुसार, गुळामुळे पाचक एंजाइम्स सक्रीय होतात, चण्यामध्ये फायबर अधिक असतात; ज्यामुळे पोटाचे आरोग्य निरोगी राहण्यास मदत मिळते. बद्धकोष्ठतेच्या समस्येतून सुटका मिळते.

**हाडे मजबूत होतात**

थंडीच्या दिवसांत सांधेदुखीची समस्या अनेकांना जाणवते. यावर उपाय म्हणून गूळ-चणे खाणे फायदेशीर ठरू शकते. डॉक्टरांच्या माहितीनुसार चण्यामध्ये फॉस्फरस आणि मॅग्नेशिअम तर गुळामध्ये कॅल्शिअम हे गुणधर्म असतात. ज्यामुळे हाडे मजबूत होण्यास मदत मिळते. सांधेदुखी किंवा संधिवात यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**रोगप्रतिकारकशक्ती मजबूत होते**

गुळातील आर्यनचे गुणधर्म नव्या रक्तपेशी तयार करण्यास मदत करतात आणि रक्त देखील शुद्ध होते. चण्यामध्ये प्रोटीन आणि खनिजांचे प्रमाण अधिक असते, ज्यामुळे शरीर आतील बाजूनं मजबूत होतं. सर्दी-खोकला यासारख्या समस्यांपासून सुटका मिळते.

**त्वचेवर तेज येते**

गूळ आणि चणे एकत्रित खाल्ल्यास ॲनिमिया म्हणजे रक्ताच्या कमतरतेची समस्या दूर होण्यास मदत मिळेल, हा डाएट विशेषतः महिलांसाठी लाभदायक ठरतो. त्वचेवर नैसर्गिक तेज येते आणि हिवाळ्यामध्ये कोरड्या त्वचेच्या समस्येतून सुटका मिळेल.

**दिवसभरात किती प्रमाणात गूळ-चण्यांचे सेवन करावे?**

नियमित २५-३० ग्रॅम भाजलेले चणे आणि १५-२० ग्रॅम गूळ खाणे योग्य आहे.अतिप्रमाणातही गुळ आणि चणे खाऊ नये अन्यथा पोटाचे त्रास होऊ शकतात. तसेच गॅस, पोट फुगणे किंवा वजन वाढणे यांसारख्या समस्या देखील होऊ शकतात. सकाळी किंवा संध्याकाळच्या नाश्त्यामध्ये गूळ-चण्याचा समावेश करू शकता. पण मर्यादित स्वरुपातच गूळ-चणे खाणे योग्य आहे.

# संपादकीय

## नाशिकमध्ये आघाडी आणि युतीतही खो!

शंकर के.




जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष आमने-सामने आले आहेत. भाजप पाच ठिकाणी स्वतंत्र निवडणूक लढवत आहे. महाविकास आघाडीमधील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) आणि शिवसेना (उबाठा)हे पक्ष तीन ठिकाणी एकमेकांविरोधात आहेत. भाजप आणि शिंदेसेना हे दोन पक्ष तीन ठिकाणी, तर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एकत्रितपणे दोन ठिकाणी लढत आहेत. याशिवाय, काही ठिकाणी शिंदेसेना व राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) एकत्रित आले आहेत. एका ठिकाणी तर शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) एकत्र आले आहेत. जिल्ह्यातील इगतपुरी, ओझर, सिन्नर, सटाणा आणि चांदवड या पाच नगर परिषदांमध्ये भाजप स्वतंत्रपणे लढत आहे. त्यांच्या विरोधात महायुतीमधील शिंदेसेना व राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) हे पक्ष रिंगणात उतरले आहेत. काही ठिकाणी शिंदेसेना व राष्ट्रवादी एकत्रितपणे भाजपच्या विरोधात असल्याचे चित्र असून, काही ठिकाणी हे दोन्ही पक्ष एकमेकांसमोर आले आहेत. इगतपुरीमध्ये भाजपच्या विरोधात शिंदेसेना व राष्ट्रवादी (अ.प.) हे एकत्रितपणे लढत आहेत. महाविकास आघाडीचे घटक पक्षही येथे एकत्रित लढत देत आहेत. नांदगावमध्ये भाजप आणि शिंदेसेना एकत्र असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) त्यांच्या विरोधात उभा ठाकला आहे. भगूरमध्ये भाजपने राष्ट्रवादीच्या (अ.प.) गटाशी हातमिळवणी केली आहे. येथे उबाठासेनेला मनसेने साथ दिली आहे. तसेच शिंदेसेनाही स्वतंत्रपणे लढत आहे. त्यामुळे येथील लढत ही चुरशीची ठरणार आहे. मनमाडच्या नगर परिषदेमध्ये भाजपने शिंदेसेना आणि रिपाइंला आपल्या साथीला घेतले आहे. या युतीला राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) आणि उबाठासेनेचे उमेदवार विरोधात आहे. मनमाड शहरामध्ये रिपाइंची ताकद आहे. त्यामुळे या युतीचा लाभ किती मिळणार हे बघितले जात आहे. येवला शहरामध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) एकत्र असून, येथे शिंदेसेनेने राष्ट्रवादीच्या (श.प.) गटाला सोबत घेतले आहे. त्यामुळे वेगळेच समीकरण रंगणार आहे. त्यामुळे येवल्यातील लढतीकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

जिल्ह्यातील त्र्यंबक, सिन्नर, सटाणा आणि चांदवड या चार ठिकाणी सर्वच पक्ष एकमेकांना शह देत आहेत. येथे सर्व पक्षांनी स्वतंत्र निवडणूक लढण्याला प्राधान्य दिले आहे. त्र्यंबकेश्वरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) आणि शिंदेसेना यांनी आधी युती जाहीर केली होती. मात्र, ऐनवेळी ही युती तोडत शिंदेसेनेने स्वतंत्रपणे उमेदवार दिल्याने निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे. उमेदवारी मिळाली नाही ते अपक्ष म्हणून आपली उमेदवारी कायम ठेवण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वत्र चुरशीच्या लढती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत देखील त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

**येवला, सिन्नर, मालेगावला भाजपची ताकद वाढली**

येवल्यात उबाठा नेते, माजी आमदार मारुती पवार आणि संभाजी पवार, तर मालेगावमधील ज्येष्ठ नेते माजी आ. अपूर्व हिरे यांच्यापाठोपाठ अद्वय हिरे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्याने दोन्ही तालुक्यात पक्षाची ताकद वाढली आहे. येवल्यात माणिक शिंदे यांनी आ. किशोर दराडे यांना साथ दिली आहे. काही दिवसांपूर्वीच सिन्नरमधून विद्यमान खासदार राजाभाऊ वाजे यांचे चुलते, माजी नगर अध्यक्ष हेमंत वाजे आणि युवा नेते उदय सांगळे यांनी आपल्या समर्थकांसह भाजपची वाट धरल्याने नगर परिषद पाठोपाठ जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी भाजपचा रस्ता सोपा झाला असल्याचे बोलले जात आहे.ओझरला प्रथमच नगर परिषदेच्या निवडणुकीला सामोरे जात असलेल्या ओझरमध्ये सर्वच पक्ष स्वतंत्रपणे लढत आहेत. त्यामुळे येथे बहुरंगी लढतीकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिले आहेत. पिंपळगाव बसवंत येथे भाजप व शिंदेसेना एकत्र असून, त्याच्यापुढे राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) तसेच काँग्रेस उमेदवार रिंगणात आहेत.

**स्थानिक पातळीवर निर्णय**

राज्यात जरी सत्ताधारी महायुती आणि महाआघाडी असली तरी स्थानिक पातळीवर वेगळा निर्णय घेण्यात आला. जिल्ह्यात अनेक ठिकाणी महायुती आणि आघाडी न झाल्यामुळे याचा परिणाम आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांवर देखील होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे; परंतु निवडणुकीनंतर मात्र पुन्हा महायुती आणि महाविकास आघाडी होऊन आम्हीच नंबर एक असा पुन्हा दावा केला जाऊ शकतो.

# सकाळी की संध्याकाळी कोणत्या वेळी तुमचे पोट साफ होते?

**दैनिक राज आनंद । वृत्तसेवा**

अनेकदा लोक याकडे लक्षच देत नाहीत की ते सकाळी जातात की संध्याकाळी, पण पोट साफ होण्याची वेळ तुमच्या पोटाच्या, आतड्यांच्या आणि मेटाबॉलिझमच्या स्थितीबद्दल खूप काही सांगते. आपले पचनतंत्रही २४ तासांच्या सर्केडियन रिदमवर चालते. ज्याप्रमाणे झोप, भूक, हार्मोन्स आणि बॉडी क्लॉक काम करतात. म्हणूनच बहुतेक लोक सकाळी उठल्यानंतर थोड्या वेळाने फ्रेश होतात, कारण त्या वेळी कोलन सर्वात जास्त सक्रिय असते.पण जर एखादी व्यक्ती रोज संध्याकाळी किंवा अनियमित वेळी पोट साफ करते, तर हे सहसा दर्शवते की त्यांचे बॉडी क्लॉक, तणावाची पातळी किंवा खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या आहेत. टायमिंगकडे लक्ष दिल्याने तुम्ही कोणतीही संकोच न करता तुमच्या मेटाबॉलिक हेल्थच्या अनेक छोट्या पण महत्त्वाच्या गोष्टी समजू शकता. पोट आणि कोलनची हालचाल दिवसभर एकसारखी नसते. सकाळी उठल्यानंतर ती सर्वात जास्त असते. संशोधन सांगते की कोलनच्या मोटिलिटीला स्वतःचा सर्केडियन रिदम असतो, जो दिवसा वेगवान आणि रात्री संथ होतो. उंदरांवर केलेल्या अनेक अभ्यासात आढळले की जर खास क्लॉक जीन्स जसे झशी१ आणि झशी२ काढून टाकले, तर पोट साफ होण्याचा रिदम पूर्णपणे बिघडतो. त्याशिवाय, सकाळी उठून जेवण केल्याने गॅस्ट्रोकोलिक रिफ्लेक्स सक्रिय होतो, जो कोलनला सिग्नल देतो की आतल्या गोष्टी पुढे ढकलाव्यात. म्हणूनच सकाळी पोट साफ होणे हे दर्शवते की तुमची बॉडी आणि गट क्लॉक एकमेकांशी सुसंगतपणे काम करत आहेत.



जर एखाद्याचे पोट रोज संध्याकाळीच साफ होत असेल, तर याचा अर्थ असू शकतो की त्याचे बॉडी क्लॉक हलले आहे. कारण रात्री कोलनची हालचाल खूप संथ होते. जर पचनक्रिया संध्याकाळी वेगवान होऊ लागली, तर यामागे उशिरा जेवणे, शिफ्ट ड्युटी किंवा अनियमित झोप असे कारण असू शकते. जेवण हेही शरीराच्या अंतर्गत घड्याळाला सेट करणारा मोठा संकेत असतो, म्हणून उशिरा जेवण्याची सवय गटचा रिदम बिघडवते. म्हणजे संध्याकाळी पोट साफ होणे हे फक्त उशिरा पचन नव्हे, तर मेटाबॉलिक रिदममध्ये गडबड झाल्याचेही लक्षण असू शकते.आतडे आणि मेटाबॉलिझम दोन्ही बॉडी क्लॉकशी जोडलेले असतात. जर झोप, जेवण किंवा दिनचर्या बिघडली तर याचा परिणाम केवळ कोलनच्या गतीवरच नव्हे, तर साखर नियंत्रण, चरबीचे मेटाबॉलिझम यावरही होतो. म्हणूनच नियमित सकाळची पोट साफ होणे हे सुसंगत मेटाबॉलिझमचे लक्षण असते, तर संध्याकाळी किंवा अनियमित वेळी होणे हे रिदम सरकल्याचे दर्शवू शकते.जर अचानक पोट साफ होण्याची वेळ बदलली आणि त्यासोबत दुखणे, रक्त पडणे, वजन कमी होणे किंवा सतत पोट फुगणे अशा तक्रारी सुरू झाल्या, तर याकडे दुर्लक्ष करू नये. सर्केडियन रिदममध्ये बिघाड खइड किंवा फंक्शनल कॉन्स्टिपेशनसारख्या समस्यांशीही जोडला जातो. काही दिवस टायमिंगकडे लक्ष दिल्यास समस्या समजण्यास मदत होते आणि वेळेवर डॉक्टरांचा सल्ला घेता येतो.

# मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करा

## केंद्र सरकारकडून बिबट नसबंदीची मान्यता-वनमंत्री गणेश नाईक

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी प्रस्तावित कामांकरिता लागणारा निधी व त्याकरिता प्रस्तावाची मागणी तात्काळ सादर करावी, तसेच कृत्रीम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर व जागतिक स्तरावरील सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात, बिबट नसबंदीबाबत केंद्राची मान्यता प्राप्त झाली असून त्याबाबतची कार्यवाही करावी, अशा सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी दिल्या. वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या सभागृहात मानव-बिबट संघर्ष उपाययोजनांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. सामाजिक वनीकरणाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, मल्लिकार्जुन,मुख्य वनसंरक्षक, नाशिक, आशिष ठाकरे, वनसंरक्षक पुणे वनवृत्त महादेव मोहिते, उपवनसंरक्षक पुणे, प्रशांत खाडे, उपवनसंरक्षक जुन्नर, श्रीधर्मबीर सालचिठल, उपवनसंरक्षक अहिल्यानगर, विवेक होशिंग, उपवनसंरक्षक वन्यजीव जयरामगौडा, उपवनसंरक्षक



शिक्षण कुलराज सिंह, उपवनसंरक्षक सोलापूर सिध्देश सावडेकर उपवनसंरक्षक नाशिक, पंकज गर्ग उपवनसंरक्षक सामाजिक वनीकरण यांच्यासह वनअधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.श्री. नाईक यांनी नाशिक मधील वनकर्मचारी यांच्यावर झालेल्या बिबट हल्लाप्रकरणी संबंधित वनकर्मचारी यांची भेट घेऊन त्यांचे मनोबल वाढविले. मानव-बिबट संघर्षाबाबत वनकर्मचारी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करीत आहेत, त्यांना आवश्यक ते सर्व साहित्य पुरविण्यात यावे. जिल्हा योजनेमधून आकस्मिक निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे. बांबू लागवड करुन बिबटला अटकाव करता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करावा , अशा सूचना श्री. नाईक यांनी दिल्या.श्री. खांडेकर यांनी बैठकीत ऊस शेती, बिबट अधिवास व त्याकरीता प्रभावी उपाययोजनांबाबत माहिती दिली. यामध्ये साखर कारखान्यांनी करावयाची कार्यवाही, टायगर फाऊंडेशनवर आधारित नियोजन तसेच बिबट्यांची गणना करणे, बिबट्यांचे मायक्रोमॅपिंग, पोल्ट्री वेस्ट तसेच हॉटेल वेस्टची विल्हेवाट, रेस्क्यू सदस्यांचा विमा काढणे, बेस कॅम्पचे सक्षमीकरण करणे, कुरण विकास करून बिबट्यांकरीता अधिवास तयार करणे, मेंढपाळ, ऊस कामगार आदीकरिता विविध उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. श्री. खाडे यांनी मानव-बिबट संघर्षाबाबत केलेल्या उपाययोजनाबाबतचे सादरीकरण केले. तर श्री. मोहिते यांनी टीटीसी बावधन मधील कामांबाबतची माहिती दिली. जून २०२६ पर्यंत ८० पेक्षा अधिक बिबट्याकरिता उपचार उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगितले. श्री. ठाकरे यांनी पिंपरखेड मधील शोध अभियान चालू ठेवण्याबाबत सूचना दिल्या आणि यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना केली. तसेच बिबट्यांच्या संख्या नियंत्रणासाठी इम्युनो-कॉन्ट्रासेप्टीव्ह पध्दतीची केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे त्यांनी यावेळी म्हणाले.

# २८ ते ३० नोव्हेंबर दरम्यान बोन्साय आणि ओरिगामी कला प्रदर्शन











**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका, वृक्ष प्राधिकरण आणि मुंबईतील जपानचे महावाणिज्य दूतावास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन निसर्गसौंदर्य आणि सर्जनशीलतेचा अनोखा मिलाफ नोव्हेंबरच्या अखेरीस मुंबईकरांना अनुभवायला मिळणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, वृक्ष प्राधिकरण आणि मुंबईतील जपानचे महावाणिज्य दूतावास यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर दरम्यान बोन्साय आणि ओरिगामी कला प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. या तीनही दिवसात हे कला प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे.बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (उद्याने) श्री. अजितकुमार आंबी यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. मुंबईतील निसर्गसौंदर्याचे अभ्यासक, जाणकार आणि निरनिराळ्या कलांची आवड जोपासणाऱ्यांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सतत नवनवीन उपक्रम हाती घेत असते. बोन्साय आणि ओरिगामी कला प्रदर्शन हे अशाच उपक्रमांचा एक भाग आहे. या प्रदर्शनात जपानी संस्कृतीतील सूक्ष्म व संयमशील कलांचे दर्शन मुंबईकरांना घडणार आहे. या कला प्रदर्शनासाठी बोन्साय स्टडी ग्रुप ऑफ द इंडो-जॅपनिज असोसिएशन व ओरिगामी मित्र यांचे सहकार्य लाभणार आहे.'बोन्साय' या लघुवृक्ष संवर्धन कलेसोबतच 'ओरिगामी' म्हणजेच कागदाच्या घड्या घालून नवनवीन कलाकृती साकारण्याची पारंपरिक जपानी कला या प्रदर्शनात अनुभवता येणार आहे. मुंबईकरांसाठी हे प्रदर्शन म्हणजे निसर्ग आणि कलेचा एकत्र उत्सव ठरणार आहे. प्रवेश सर्वांसाठी विनामूल्य आहे, अशी माहिती उद्यान अधीक्षक श्री. जितेंद्र परदेशी यांनी दिली.

# हजारोंच्या उपस्थितीत काँग्रेस व वंचित आघाडीच्या उमेदवारांचे नामांकन दाखल

## विधिमंडळ पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार यांची उपस्थिती–ब्रम्हपुरी नगरपरिषद निवडणूक



**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यात निवडणुकीची धामधूम सुरू असताना आज नामांकन दाखल करण्याच्या अंतिम दिनी राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हजारों कार्यकर्त्यांच्या साक्षीने ब्रम्हपुरी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी प्रणित पॅनलचे नगराध्यक्ष पदासह एकूण २४ उमेदवारांचे नामांकन दाखल करण्यात आले.

आज सकाळपासूनच संपूर्ण ब्रह्मपुरी शहरांमध्ये नामांकन दाखल करण्याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.तर आज नामांकन दाखल करण्याच्या अंतिम दिनी विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांच्या ब्रह्मपुरी येथील जनसंपर्क कार्यालय ते नगरपरिषद कार्यालय पर्यंत हजारोंच्या संख्येने उपस्थितीत विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक नेते, तालुका पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत ढोल ताशांच्या गजरात पदयात्रा काढून नगराध्यक्ष व नगरसेवक पदाकरिता नामांकन दाखल करण्यात आले. ब्रह्मपुरी शहरात स्थानिक पातळीवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी पक्षाची आघाडी झाल्याने आज वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार यांनी देखील नामांकन अर्ज सोबतच दाखल केले.

यात नगराध्यक्ष पदासाठी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार म्हणून योगेश मिसार यांनी नामांकन दाखल केले. तर नगर सेवक पदाकरीता प्रभाग १ (अ)सौ. काजल राजेश तलमले, (ब)चंद्रकांत ज्ञानेश्वर बावनकुळे, प्रभाग २ (अ)सौ. बबीता किशोर आमले,(ब)प्रकाश शामराव खोब्रागडे, प्रभाग ३ (अ)मनोज प्रभाकर कावळे (ब) सौ. रेणुताई राहुल ठेंगरी, प्रभाग ४ (अ) डॉ.प्रेमलाल मेश्राम (ब) सौ. जयश्री दिलीप कुथे, प्रभाग ५ (अ)सतिश ज्ञानेश्वर हुमने,(ब)सौ. रंजना नंदू पिसे, प्रभाग ६ (अ) हेमलता सिंहगडे (ब) जगदिश नंदूजी पिलारे, प्रभाग ७ (अ) गिता मेश्राम (ब)सचिन केवळराम राऊत, प्रभाग ८ (अ) पुष्पलता सुधाकर पोपटे,(ब)नितीन जनार्धन उराडे, प्रभाग ९ (अ)अनिल श्रीराम दोनाडकर, (ब)सौ. सपना संजय बल्लारपूरे, प्रभाग १० (अ) राकेश रामचंद्र पडोळे, (ब)सौ. ज्योती मुकुंदा राऊत, प्रभाग ११ (अ) सौ. माधुरी सोमेश्वर उपासे, (ब) सौ. रंजना गिरीश बुराडे, (क) सारंग रमेश बनपुरकर या उमेदवारांच्या समावेश आहे.

काँग्रेस व वंचित आघाडीच्या उमेदवारांची नामांकन दाखल करतेवेळी प्रामुख्याने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्राचार्य देविदास जगनाडे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष खेमराज तिडके, शहराध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. राजेश कांबळे, प्रमोद चिमूरकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रभाकर सेलोकर , प्रदेश सचिव डॉ. थानेश्वर कायरकर, जिल्हा बँक संचालक दामोदर मिसार, जिल्हा काँग्रेस सचिव वासु सोंदरकर, ऋषींजी राऊत, फाल्गुन राऊत, सोनू नाकतोडे, गाजी पटेल, इकबाल जेसानी, माजी नगराध्यक्ष वनिता ठाकूर, बालू पिसे, संजय ठाकूर, अण्णा ठाकरे,महिला काँग्रेस शहराध्यक्ष योगिता आमले, कृऊबा उपसभापती सुनीता तिडके वंचित बहुजन आघाडीचे नेते लिलाधर वंजारी, तथा तालुका काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# धुमस्त्या काळात प्रेमाचाच मार्ग आशादायी कसबे बंडेलू यांच्या पुस्तकांचे प्रकाशन संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्त्या व साहित्यिक नीलिमा जाधव बंडेलू यांच्या ' अगापे' या कथासंग्रहाचा तसेच संदर्भ या कवितासंग्रहाच्या द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन नुकतेच मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

शहरातील ग्रामीण विकास अभ्यास केंद्र या ठिकाणी ख्रिस्ती अस्मिता साहित्य परिषद यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी चित्रकार श्रीधर अंभोरे होते.यावेळी लेखक व समीक्षक मिलिंद कसबे,केंद्र संचालक डॉ.सुरेश पठारे,प्रा. डॉ बापू चंदनशिवे,सामाजिक कार्यकर्त्या तारा सातपुते,प्रा.रविंद्र सातपुते आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री.कसबे म्हणाले,आजच्या संदर्भहीन परंतु धुमसत्या काळात आपण उभे आहोत.पण प्रेमानेच आपल्याला त्याला तोंड देत मार्ग शोधावा लागणार आहे.अशावेळी ' संदर्भ' मधील साळुंखी ही कविता आपल्याला प्रेमाचा ऑक्सिजन पुरवते. खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना ही साळुंकी विषारी वायू वाढले की सावधगिरीचा इशारा देते.त्यामळे हे कामगार बाहेर येतात.

समाजात अशा साळुंख्यांची गरज आहे,असा संदेश हे पुस्तक देते. सुप्रसिद्ध लेखक थॉमस पेन म्हणतात त्याप्रमाणे निसर्गधर्म हा एकमेव धर्म आहे आणि ख्रिस्ती संस्कृतीत हा धर्म आपल्याला आढळतो,असे कसबे म्हणाले. श्री.अंभोरे म्हणाले की, अगापे यातील कथा पर्ल एस बक या गाजलेल्या इंग्रजी लेखिकेच्या गुड अर्थ मधील कथेसारख्या दर्जेदार असून याची इंग्रजीमध्ये भाषांतर होणे गरजेचे आहे, मातृत्व आणि निसर्ग यामध्ये आगापे प्रेम साकारलेला आहे.

डॉ. सुरेश पठारे म्हणाले, अगापे वाचणे हा अतिशय वेगळा अनुभव होता. समाजाप्रती संवेदनशील ते बरोबरच समाजामध्ये बदल घडवून आणण्याची लेखिकेचे वृत्ती यामधून प्रतीत होते. या कथांमध्ये सशक्त व शाश्वत समाज निर्मिताचा आशावाद आहे.,असे ते म्हणाले.कार्यक्रमात आद्य शिक्षिका सिंथिया फरार, लक्ष्मीबाई टिळक व क्रांतिकारी सामाजिक कार्यकर्त्या पंडिता रमाबाई तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई व फातिमा बी यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रा.चंदनशिवे,तारा सातपुते यांनी विचार व्यक्त केले.प्रा. प्रियदर्शन बंडेलू यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन चित्रकार रवींद्र सातपुते यांनी तर सूत्रसंचालन डॉ. शैलेंद्र बनसोडे यांनी केले. शेवटी बनसोडे यांनी गजल सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.



**श्रीमती बंडेलू यांच्या अगापे आणि संदर्भ पुस्तकाचे प्रकाशन करताना मान्यवर**

# ग्राहक पंचायत, महाराष्ट्र यांचेकडून जेष्ठं साधकांना जीवन गौरव पुरस्कार



**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर चे ज्येष्ठ सदस्य रणजित श्रीगोड, बाबासाहेब भालेराव, सखाराम खतोडे, मच्छिंद्र मंडलीक, संदिप आगरवाल यांना ग्राहक पंचायत महाराष्ट्र नाशिक विभाग यांच्यातर्फे जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच गोरख बारहाते, संजय देवकर, राजेंद्र कळमकर, सिध्दार्थ वाघमारे यांना उत्कृष्ट साधक म्हणून सन्मानीत करण्यात आले. नंदुरबार जिल्हातील तळोदा येथेही नाशिक विभागीय ग्राहक पंचायतीचा नुकताच अभ्यास वर्ग संपन्न झाला.

आमदार पाडवी यांच्या हस्ते या अभ्यास वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. ग्राहक पंचायत चे राज्य अध्यक्ष डॉ विजयजी लाड यांचे सह राज्यातील अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, जिल्ह्यातील ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वामी विवेकानंदाच्या प्रतिमेचे पुजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. राज्य ग्राहक पंचायतीचे कामा संदर्भात धाराशिव येथील मेधाताई कुलकर्णी व अहिल्यानगरचे जिल्हा संघटक प्रा डॉ राजेंद्र कळमकर यांनी माहिती दिली. यावेळी बाबासाहेब भालेराव व इतर ज्येष्ठ सदस्य यांचे ग्राहक पंचायती माध्यमातुन दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना सन्मान पत्र देऊन जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तळोदा येथील प्रा. जयपाल सिंह शिंदे, भुसावळ येथील संजयजी शुक्ला, ॲड, सुरेंद्र जी सोनवणे, अरुण वाघमारे, रणजीत श्रीगोड, प्रा. चंद्रकांत डागा, पी झेड कुवर, चंद्रकांत योशिराव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये स्टुडंट्स लिड कॉन्फरेन्स उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने स्टुडंट्स लीड कॉन्फरेन्स अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले , खजिनदार आशाताई बिले , संचालिका डॉ. स्वाती बिले , डॉ. सुनीता दोशी , डॉ.निशा सारंकर ,ज्योती मुथा , मुख्याध्यापिका अमृता परदेशी , सर्व शिक्षक स्टाफ व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची मोडेल्स सादर केले. यामध्ये विज्ञान युगातील विविध साधनांचा समावेश होतो. मिशन सिंदूर,वॉटर इलेक्ट्रिसिटी,रोबोट, आत्मनिर्भर भारत, कंप्युटर, डीएनए मॉडेल, हर्बेरियम अशा सर्व विषयांचे विविध मॉडेल प्रोजेक्ट तयार करून मुलांनी त्याबद्दल माहिती दिली. यातून मुलांचा आत्मविश्वास ओसंडून दिसत होता.संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश बिले यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व अनमोल असे मार्गदर्शन केले. दोशी व मुथा यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मनभरून कौतुक केले.विद्यार्थ्यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. सत्रसंचालन स्कूलचे विद्यार्थी आकांक्षा कदम व वेदांत कादगे या विद्यार्थ्यांनी केले. मान्यवरांचे आभार प्रदर्शन वेदांत कादगे या विद्यार्थ्याने केले.




# कल्याण डोंबिवलीत भाजपाचा एकनाथ शिंदे यांना धक्का–अनमोल वामन म्हात्रे यांनी हाती घेतले कमळ

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण डोंबिवली मध्ये सतत काही ना काही राजकीय भूकंप पाहायला मिळत आहे. महायुतीत पक्षापक्षांमध्येच फूट पडलेली दिसून येतेय. गेल्या काही दिवसांत शिवसेना शिंदे गटातून अनेक माजी नगरसेवक आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केल्याने शिंदे सेना आणि भाजपामध्ये कमालीचा तणाव वाढला आहे.

अशातच आता कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर भाजपने एक मोठा राजकीय डाव टाकत शिंदे गटाच्या शिवसेनेला जोरदार धक्का दिला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत कल्याण-डोंबिवलीतील शिवसेनेचे दिवंगत नेते वामन म्हात्रे यांचे पुत्र अनमोल वामन म्हात्रे यांनी पत्नी अश्विनी म्हात्रे यांच्यासह भाजपचे कमळ हाती घेतले. या पक्षप्रवेशापूर्वी भाजपने कमालीची गुप्तता बाळगली होती. शिवसेनेचे दिवंगत वामन म्हात्रे हे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत पाच वेळा नगरसेवक आणि चार वेळा स्थायी समिती अध्यक्ष राहिलेले सर्वात मोठे नेते होते. त्यांचा मुलगा अनमोल म्हात्रे यांच्याकडे वडिलांची मोठी राजकीय पुण्याई आणि जनमानसात असलेले समर्थन आहे. अनमोल म्हात्रे यांचा भाजप प्रवेश हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. आगामी निवडणुकीत याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.



# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयात बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञानाचे धडे

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात भरविण्यात आलेला बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. आनंद, उत्साह आणि व्यवहारिक ज्ञानाचा संगम घडवणारा हा मेळावा विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने अनुभवमेळा ठरला.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल, भाजीपाला व फळांचे स्टॉल, तसेच स्टेशनरी आणि जीवनोपयोगी वस्तूंचे स्टॉल अशा दोनशेपेक्षा अधिक स्टॉल्समुळे शाळेचे प्रांगण रंगतदार वातावरणाने गजबजून गेले होते. पाणीपुरी, समोसे, इडली-सांबर, पापड भाजी, फराळाचे पदार्थ, गोडधोड अशा स्वादिष्ट पदार्थांच्या स्टॉल्सवर पालक आणि विद्यार्थ्यांची विशेष गर्दी पाहायला मिळाली. मुलांनी स्वतः बनवलेले पदार्थ, त्यांची मांडणी, विक्री आणि व्यवहार हाताळण्याची पद्धत पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले.

या मेळाव्याचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव तथा प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष लक्ष्मण ठाणगे, जिजामाता कन्या निवासच्या अधिक्षिका ज्योतीताई मोकळ, डॉ. नाबगे, गुंजाळ, देशमुख मॅडम, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर, सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. एम. गारुडकर, एस. व्ही. दोमल यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना प्राचार्या छायाताई काकडे म्हणाल्या की,



पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांनी व्यवहारिक ज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. अशा आनंद मेळाव्यातून खरेदी-विक्रीची प्रक्रिया, पैसा व्यवस्थापन, माणसांशी संवाद, सांघिक कार्य कौशल्ये विद्यार्थ्यांत विकसित होतात. फास्टफूडच्या काळात कोणते खाद्यपदार्थ पौष्टिक, कोणते हानिकारक हे त्यांनी स्वतः अनुभवातून समजून घेतल्याचे स्पष्ट केले.

डॉ. के. एच. शिंदे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी लहान वयातच व्यवहारिक ज्ञान शिकणे गरजेचे आहे. या मेळाव्यातील खरेदी-विक्रीच्या अनुभवातून त्यांच्यात आत्मविश्वास आणि उद्योजकता विकसित होण्यास मदत होते. रयत शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत विविध उपक्रम राबवित असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. एस. जी. पिसाळ यांनी केले. आभार ज्येष्ठ शिक्षक एम. एन. भद्रे यांनी मानले. मेळाव्यात विद्यार्थ्यांसह पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय पातळीवर परळीचे नाव अभिमानाने उंचावणारी सुवर्णकन्या आभा मुंडे

## सलग दुसऱ्या वेळा राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत केली पाच सुवर्णपदकांची कमाई

**दैनिक वादळ वार्ता**

**हैदराबाद । प्रतिनिधी**

हैदराबाद येथील जी एम सी बालयोगी स्टेडियम येथे संपन्न झालेल्या २५ व्या राष्ट्रीय पॅरा जलतरण स्पर्धेत परळी तालुक्यातील डाबी येथील रहिवाशी असणाऱ्या व विद्यावर्धिनी विद्यालयात नववीचे शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग जलतरणपटू कु. आभा गणेश मुंडे हिने जलतरणात दमदार कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर तब्बल ५ सुवर्णपदके पटकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि परळीची बीड जिल्ह्याची व महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावेल अशी अभिमानास्पद कामगिरी केली आहे.

याबाबत माहिती अशी की जी एम सी बालयोगी स्टेडियम हैदराबाद या ठिकाणी आज २५ वी पॅरा जलतरण राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाली. या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत परळी तालुक्याची भूमिपुत्र असणारी दिव्यांग जलतरणपटू कुमारी आभा गणेश मुंडे या गुणी जलतरणपटूने आपली जिद्द चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवर परळीची, बीड जिल्ह्याची आणि महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावेल अशी कामगिरी नोंदवत पाच सुवर्ण पदकांना गवसणी घातली आहे. आभाने ५० मीटर फ्रीस्टाइल, १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि १०० मीटर बटरफ्लाय या वैयक्तिक प्रकारात चमकदार प्रदर्शन करून ३ सुवर्ण पदके मिळवली. तसेच महाराष्ट्र संघाच्या १००ह्व४ फ्रीस्टाइल रिले आणि १००ह्व४ मिक्स मिडले रिले स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आणखी २ सुवर्ण पदके मिळवून एकूण ५ सुवर्ण पदकांची कमाई केली.तिच्या या उल्लेखनीय यशामुळे परळी, बीड जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. आभाने यापूर्वीही जलतरण आणि योगा अशा विविध राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदके मिळवली असून राष्ट्रीय जलतरन स्पर्धेत सलग दोन वेळा पाच सुवर्णपदके कमावणारि ती बीड जिल्ह्याची पहिली राष्ट्रीय खेळाडू आहे. नुकत्याच राष्ट्रीय पातळीवरती संपन्न झालेल्या पहिल्या राष्ट्रीय दिव्यांग योगा स्पर्धेत देखील तिने नॅशनल लेवलला प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले होते. दोन वेगवेगळ्या खेळात सुवर्ण कामगिरी करत आभाने राष्ट्रीय पातळीवर परळीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांमुळे तिने जलतरण क्षेत्रात सबंध देशभरात आपली स्वतंत्र भक्कम ओळख निर्माण केली आहे. आभाने हे यश तिचे पालक गणेश मुंडे व वैजनाथ वेरूळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रॅक्टिस मधील सातत्य आणि कठोर परिश्रम घेत संपादन केले केले असून जलतरणात राष्ट्रीय पातळीवरती आपली वेगळी छाप सोडली आहे.सध्या आभा ही परळीच्या विद्यावर्धिनी विद्यालयात नववीत शिक्षण घेत असून शालेय स्तरावरही ती खेळ आणि शिक्षणात समान प्रगती करत आहे. परळीच्या भूमीतून राष्ट्रीय स्तरावर सुवर्ण कामगिरी करत झळकणाऱ्या या परळीच्या सुवर्ण कन्येच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, सर्वच स्तरांमधून परळीचा तथा बीड जिल्ह्याचा अभिमान म्हणून तिचा गौरव केला जात आहे.



# लोहा तालुक्यातील सायाळमध्ये 'अन्नदाता सुखी भव' गटाचा प्रक्रिया उद्योग सुरु

## ७५ टक्के अनुदानावर युवा शेतकरी रत्नाकर पाटील ढगे यांचा डाळ मिल, सेलर आणि क्लिनिंग युनिटचा शुभारंभ

**दैनिक वादळ वार्ता**

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना उत्पादन प्रक्रिया व मूल्यवर्धनाच्या दिशेने प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा परिषद, नांदेड यांच्या सूक्ष्म प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत अन्नदाता सुखी भव या शेतकरी गटाला ७५ टक्के अनुदानावर वितरित करण्यात आलेल्या प्रक्रिया उद्योग डाळ मिल, सेलर व धान्य साफ करणाऱ्या क्लिनिंग मशीनचे उद्घाटन आज करण्यात आले.



या उद्योगाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विधीवत पूजन करून उद्योगाचा शुभारंभ केला.या प्रसंगी वैजनाथ निरडे सर, युवा उद्योजक दिगंबर कपाटे, माधव ढगे पाटील, गंगाधर ढगे पाटील, तसेच मोठ्या संख्येने शेतकरी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

उद्घाटनानंतर सर्व मान्यवरांनी मशीनरीचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. मशीन सुरू करून टेस्ट घेतली असता धान्य साफ करण्याच्या क्लिनिंग मशीनमधून अतिशय उत्कृष्ट, स्वच्छ व दर्जेदार धान्य बाहेर येत असल्याचे सर्वांनी पाहिले. उद्योगाचे कार्यप्रदर्शन पाहून अधिकारी आणि पाहुण्यांनी समाधान व्यक्त केले. डॉ. निलकुमार ऐतवडे सर यांनी यावेळी सांगितले की,शेतकऱ्यांनी उत्पादनावर प्रक्रिया करून मूल्यवर्धन केल्यास शेती फायदेशीर ठरते. जिल्हा परिषद नांदेड या योजनेद्वारे ग्रामीण भागात अनेक सूक्ष्म प्रक्रिया उद्योग निर्माण करत आहे. रत्नाकर ढगे यांचा हा उपक्रम सर्व शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमादरम्यान सर्व मान्यवरांनी जिल्हा परिषदेच्या बायोगॅस यंत्र, कडबा कुट्टी यंत्र आणि टोकन मशीन यांचीही पाहणी केली. या यंत्रणेमुळे ऊर्जा बचत, सेंद्रिय खत निर्मिती आणि पशुखाद्य व्यवस्थापन यास चालना मिळते, असे ऐतवडे सरांनी सांगितले. युवा शेतकरी रत्नाकर पाटील ढगे यांनी सांगितले की या उद्योगाद्वारे आम्ही स्थानिक शेतकऱ्यांचे हरभरा, तूर, गहू, डाळी व इतर धान्य स्वच्छ करून ग्रेडिंगसह पॅकिंग करणार आहोत. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनाला योग्य दर आणि थेट ग्राहकांपर्यंत पोहोच मिळेल.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांनी 'अन्नदाता सुखी भव' शेतकरी गटाचे आणि रत्नाकर पाटील ढगे यांच्या पुढाकाराचे अभिनंदन केले. उपस्थित सर्वांनी या उपक्रमाला शेतकरी आत्मनिर्भरतेकडे नेणारा आदर्श प्रयोग असे गौरवले.

# काँग्रेसच्या माजलगांव तालुकाध्यक्ष पदी दत्ता कांबळे यांची निवड

## नगरपरिषद निवडणूक तोंडावर काँग्रेसचा मोठा बदल

**दैनिक वादळ वार्ता**

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

येथील काँग्रेसचे चळवळीतील कार्यकर्ते दत्ता लक्ष्मण कांबळे यांची काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने माजलगाव तालुका काँग्रेसच्या प्रभारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



भाजप शासनाच्या जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणा-या धोरणावर तसेच सर्वसामान्य जनतेला भेडसावणा-या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभिर विषयावर जागरूकता निर्माण करण्यासाठी दिवसरात्र झटत धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यात व देशात आणण्यासाठी मेहनत घेण्यासाठी आणि पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या दत्ता कांबळे यांची काँग्रेसच्या माजलगाव तालुकाध्यक्ष प्रभारीपदी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे, देशाच्या नेत्या सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रमेश चेन्नीथला, खा. रजनी पाटील, मा. मंत्री अशोकराव पाटील, आदित्य पाटील, जिल्हा प्रभारी धिरज देशमुख, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील यांनी निवड केली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# गौतम जळबाजी वाघमारे यांची महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेच्या लोहा तालुकाध्यक्षपदी निवड

**दैनिक वादळ वार्ता**

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेच्या वतीने दिनांक १६ ऑक्टोबर २०२५* रोजी विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत *खडक मांजरी (ता. लोहा)* येथील पोलिस पाटील *गौतम जळबाजी वाघमारे* यांची एकमताने *लोहा तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



या बैठकीस *संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मा. श्री. गंगाधर केशवराव उगे, नांदेड जिल्हाध्यक्ष **मा. मंगेश पाटील वाडकर* आणि जिल्हा सचिव *सौ. सविता विजयकुमार वादे* उपस्थित होते.

गौतम वाघमारे यांच्या या निवडीचा खडक मांजरी गावात व आजूबाजूच्या परिसरात आनंद व्यक्त करण्यात आला असून,खडक मांजरी गावकऱ्यांकडून त्यांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. गावकऱ्यांनी वाघमारे यांच्याकडून गाव व तालुक्यातील नागरिकांसाठी निष्ठेने व कर्तव्यभावनेने कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बोलताना गौतम वाघमारे यांनी संघटनेने दर्शविलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले व पुढेही सर्वसामान्य पोलीस पाटील बांधवांसाठी कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

## लोहा न.प.निवडणुकीसाठी भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार

# गजानन सुर्यवंशी यांच्या सह १० प्रभागातील २० जणांनी शेवटच्या दिवशी केले नामांकन पत्र दाखल

**दैनिक वादळ वार्ता**

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

बहुचर्चित लोहा न.प. २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी लोह्यासह जिल्ह्यात कुठेही महायुती झाली नसुन भारतीय जनता पार्टी ने नगराध्यक्ष पदासहीत आपले लोहा न.प. च्या १० प्रभागातील २० जणांचे नामांकन पत्र दि.१७ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी नामांकन पत्र लोहा तहसिल कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केली आहेत.



यात भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन सुर्यवंशी, व न.प. सदस्य पदासाठी प्रभाग क्रमांक १अ- सचिन सुभाषराव सुर्यवंशी नागरिकांचा प्रमागासवर्ग),१ब- मनिषा कांतराव डोईफोडे (सर्वसाधारण महिला),२ अ- ज्योती निखील महाबळे (अनु जाती महिला) २ ब-हनमंत बळवंतराव लांडगे (सर्वसाधारण खुला),३अ-हबीब नबीसाब शेख (नागरिकांचा मागासप्रवर्ग) ब- रिना अमोल व्यवहारे (सर्वसाधारण खुला महिला प्रवर्ग)४अ- रेखा दत्तात्रय कांबळे (अनु जाती महिला)ब- लक्ष्मण मारोती फुलवरे ( सर्वसाधारण खुला)५अ-बबन रुकमाजी निर्मले (अनु जाती)ब- प्रभावती गजानन गुंठे ( सर्वसाधारण खुला महिला)६अ-शिला माधव हाके (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला)ब-प्रशांत शंकरराव कऱ्हाळे (सर्वसाधारण खुला)७ अ - गोदावरी गजानन सुर्यवंशी ( सर्वसाधारण खुला महिला )ब-युवराज वसंतराव वाघमारे (सर्वसाधारण खुला) ८अ- सुप्रिया सचिन सुर्यवंशी (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला)ब संदिप ज्ञानेश्वर दमकोंडवार ( सर्वसाधारण),९अ- शिवकांता मारोती पंदलवाड (सर्वसाधारण खुला महिला)ब-मिलिंद माधवराव पवार,१०अ- रंजना लक्ष्मण कांजले (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), ब- संजय नागोराव चव्हाण (सर्वसाधारण खुला)

यांना भारतीय जनता पार्टी ने उमेदवारी दिली असुन या सर्वांनी लोहा तहसिल कार्यालयात दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी आपले नामांकन पत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केली आहेत.

# कॅन्सर ऑपरेशननंतर बाबासाहेब मस्के यांची सुजात (दादा) आंबेडकर यांनी घेतली सदिच्छा भेट

**अंबाजोगाई येथील राहत्या घरी जाऊन तब्येतीची केली विचारपूस**

**दैनिक वादळ वार्ता**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वंचित शहराध्यक्ष तथा रोखठोक न्यूज चे संपादक बाबासाहेब मस्के यांचे नुकतेच कॅन्सरचे ऑपरेशन पार पडले असून सध्या ते उपचार घेत आहेत. त्यांची प्रकृती जाणून घेण्यासाठी वंचितचे युवा नेते सुजात (दादा) आंबेडकर यांनी अंबाजोगाई येथील त्यांच्या राहत्या घरी भेट देत सदिच्छा भेट घेतली.

नगरपरिषदेच्या प्रचारादरम्यान अंबाजोगाई येथे आलेल्या सुजात दादा आंबेडकर यांनी मस्के यांच्याशी संवाद साधत त्यांच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती घेतली. कुटुंबीयांशी चर्चा करत त्यांनी मस्के लवकर पूर्ण बरे व्हावेत अशी मन:पूर्वक शुभेच्छा दिली.या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि समाधानाचे वातावरण असून बाबासाहेब मस्के लवकरापासून कामकाजात रुजू व्हावेत, यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077